# सिमुलेशन ॲण्ड स्कील सेंटर वैद्यकीय क्षेत्रास वरदान ठरेल

## कुलगुरू डॉ. शिर्के; डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात उद्‌घाटन

**कोल्हापूर, ता. २२ :** डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयातील अत्याधुनिक सिमुलेशन ॲण्ड स्कील सेंटर हे कोल्हापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. सिमुलेशन ॲण्ड स्कील सेंटरच्या उद्‌घाटनावेळी ते बोलत होते. डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात सिमुलेशन ॲण्ड स्कील सेंटरचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, डॉ. राकेश शर्मा.**

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे सेंटर सुरू झाले आहे. डॉ.शिर्के म्हणाले,"डॉ. डी. वाय. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. संजय पाटील यांच्या दूरदृष्टीने देशातील अत्याधुनिक सिमुलेशन ॲंड स्कील सेंटर सुरू झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील कौशल्ये वृद्धिंगत होण्यासाठी तसेच वैद्यकीय नर्सिंग, फिजिओथेरपी शिक्षण घेणाऱ्यांना, वैद्यकीय प्रॅक्टिस करणाऱ्यांना सेंटर उपयुक्त ठरणार आहे.

डॉ. संजय डी.पाटील म्हणाले, "रुग्णालयाच्या माध्यमातून लोकांना दर्जेदार सुविधा आणि उपचार उपलब्ध करून दिले आहे. सिम्पुलेशन आणि स्किल सेंटर मुळे विद्यार्थी आणि डॉक्टर यांना परिपूर्ण ज्ञान मिळेल."

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र कुलगुरू डॉ शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ.विश्वनाथ भोसले, अधिष्ठाता डॉ राकेश शर्मा वैद्यकीय अधीक्षिका डॉ. वैशाली गायकवाड, डॉ. ऐ के गुप्ता, उपकुलसचिव संजय जाधव, सहायक प्रबंधक अजित पाटील उपस्थित होते.

# 'सिमुलेशन अँड स्कील' सेंटर कोल्हापूरसाठी ठरेल वरदान : कुलगुरू

## डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल कदमवाडी येथे केंद्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल कदमवाडी नव्याने सुरू करण्यात आलेले अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटर हे मेडिकल हब झालेल्या कोल्हापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते सिमुलेशन अँड स्कील सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

> हॉस्पिटलच्या माध्यमातून लोकांना दर्जेदार सुविधा आणि उपचार उपलब्ध करून दिले आहे. नेहमीच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. सिमुलेशन आणि स्कील सेंटरमुळे विद्यार्थी आणि डॉक्टर यांना परिपूर्ण ज्ञान मिळेल. या पुढील काळातही दर्जेदार आणि नवनवीन सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्न केले जातील.
>
> **- डॉ. संजय पाटील,**
> अध्यक्ष डी. वाय. पाटील ग्रुप

डॉ. शिर्के म्हणाले, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाने अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटर सुरू झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील कौशल्ये वृद्धिंगत होण्यासाठी हे सेंटर उपयुक्त ठरणार आहे. वैद्यकीय, नर्सिंग, फिजिओथेरपी शिक्षण घेणाऱ्यांना उपयुक्त अनुभव या ठिकाणी मिळेल. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव संजय जाधव, सहायक प्रबंधक अजित पाटील यांच्यासह संस्थेतील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. वृंदन जाधव, डॉ. नितीन शिंपी, निनाद कुबल यांनी या सेंटरच्या उभारणीची तांत्रिक बाजू सांभाळली आहे.



कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल कदमवाडी येथे नव्याने सुरू करण्यात आलेले अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटरचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील आदींसह मान्यवर.

# सिमुलेशन अँड स्किल सेंटर वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरेल

## कुलगुरू डॉ. शिर्के : डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे कदमवाडी येथील डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये नव्याने सुरू होणारे अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्किल सेंटर हे मेडिकल हब झालेल्या कोल्हापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते सिमुलेशन अँड स्किल सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आ. ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के पुढे म्हणाले, डॉ. डी. वाय पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि त्यांच्या दूरदृष्टीने देशातील अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्किल सेंटर सुरू झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील कौशल्ये वृद्धिंगत होण्यासाठी हे सेंटर उपयुक्त ठरणार आहे. वैद्यकीय, नर्सिंग, फिजिओथेरपी शिक्षण घेणाऱ्यांना आणि वैद्यकीय प्रॅक्टिस करणाऱ्यांना हे सेंटर उपयुक्त ठरेल.



**कोल्हापूर : सिमुलेशन अँड स्किल सेंटरचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डॉ. संजय डी. पाटील, आ. ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, डॉ. राकेश शर्मा आदी उपस्थित होते.**

डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, हॉस्पिटलच्या माध्यमातून लोकांना दर्जेदार सुविधा व उपचार उपलब्ध करून दिले आहेत. सिमुलेशन आणि स्किल सेंटरमुळे विद्यार्थी आणि डॉक्टर यांना परिपूर्ण ज्ञान मिळेल. भविष्यातही दर्जेदार आणि नवनवीन सुविधा देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. राकेश शर्मा, डॉ. वैशाली गायकवाड, डॉ. ए. के. गुप्ता, संजय जाधव, अजित पाटील यांच्यासह संस्थेतील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. वृंदन जाधव, डॉ. नितीन सिप्पी, निनाद कुबल यांनी सेंटरची तांत्रिक बाजू सांभाळली आहे.

# डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये सिमुलेशन सेंटर

## सिमुलेशन अॅन्ड स्कील सेंटर वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कसबा बावडा : डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल कदमवाडी येथे नव्याने सुरू करण्यात आलेले अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटर हे मेडिकल हब झालेल्या कोल्हापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते सिमुलेशन अँड स्कील सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल कदमवाडी येथे नव्याने सुरू करण्यात आलेले अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटरचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, आदी उपस्थित होते.

डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि त्यांच्या दूरदृष्टीने देशातील अत्याधुनिक सिमुलेशन अँड स्कील सेंटर सुरू झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील कौशल्ये वृद्धिंगत होण्यासाठी हे सेंटर उपयुक्त ठरणार आहे. वैद्यकीय, नर्सिंग, फिजिओथेरपी शिक्षण घेणाऱ्यांना आणि वैद्यकीय प्रॅक्टिस करणाऱ्यांना अतिशय उपयुक्त अनुभव या ठिकाणी मिळेल. यावेळी बोलताना डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, हॉस्पिटलच्या माध्यमातून लोकांना दर्जेदार सुविधा आणि उपचार उपलब्ध करून दिले आहेत. सिम्युलेशन आणि स्कील सेंटरमुळे विद्यार्थी आणि डॉक्टर यांना परिपूर्ण ज्ञान मिळेल. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र. कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. वैशाली गायकवाड, टेक्निकल डिरेक्टर डॉ. ऐ. के. गुप्ता, उपकुलसचिव संजय जाधव, आदींसह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. वृंदन जाधव, डॉ. नितीन सिप्पी, निनाद कुचल यांनी या सेंटरच्या उभारणीची तांत्रिक बाजू सांभाळली आहे.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा २७ पासून

## वेळापत्रक जाहीर : 'डिप्लोमा'च्या परीक्षांची जबाबदारी महाविद्यालयांवर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदविका (डिप्लोमा), पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांची जबाबदारी संलग्नित महाविद्यालये आणि अधिविभागांवर सोपविण्यात आली आहे. या परीक्षा दि. २७ ऑक्टोबर ते दि. ५ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे.

अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने या परीक्षा शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालय आणि अधिविभागांकडे देण्याचा निर्णय घेतला आहे. कॉम्प्युटर बेस्ड टेक्सटाईल, फूड प्रोसेसिंग अँण्ड प्रिझर्व्हेशन, कॉम्प्युटर अॅप्लिकेशन,



न्यूट्रिशियन अँण्ड डायटेटिक्स, ग्रीन केमिस्ट्री अँण्ड क्रॉप प्रोटेशन, अशा विविध ५२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय, अधिविभागांकडून घेतल्या जाणार आहेत.

परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १०३२ इतकी आहे. या परीक्षा ५० गुणांच्या आणि बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पद्धतीने होतील. त्यासाठी एक तासाचा वेळ असणार आहे. या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांची तपासणी करून गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्याची प्रक्रिया महाविद्यालय, अधिविभागांनी करायची आहे. या परीक्षा घेण्याचा खर्च विद्यापीठाकडून देण्यात येणार आहे.

दरम्यान, कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि इतर सर्व अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू होतील. त्याचे वेळापत्रक हे विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

# विद्यापीठातील बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी

## उदय सामंत यांची घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येईल. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर केलेल्या विविध प्रकल्पांसाठीचा निधी प्रदान करण्याबाबत पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी दिली.

विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत दि. १५ ऑक्टोबरला बैठक घेण्यात येईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले होते. त्यानंतर चार दिवस उलटले, तरी बैठक झाली नाही. त्याकडे 'शिवाजी विद्यापीठाच्या प्रश्नांबाबतच्या बैठकीचा उच्चशिक्षण मंत्र्यांना विसर' या वृत्ताद्वारे 'लोकमत'ने लक्ष वेधले. त्यानंतर मंत्री सामंत यांनी बुधवारी ऑनलाईन बैठक घेतली. ते मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे सर्वच संबंधित घटकांना निर्देश दिले.

विद्यापीठानेसुद्धा आपल्या प्रश्नांबाबत काही त्रुटी असल्यास त्यांची तातडीने पूर्तता करून ते सोडविण्यासाठी पाठपुरावा करायला हवा, असे मंत्री सामंत यांनी सांगितले. शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध व प्रलंबित डीसीपीएस सानुग्रह अनुदानाबाबत सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश त्यांनी संचालकांना दिले. प्रलंबित प्रश्न पूर्णतः सोडविले जावेत, अशी माझी भूमिका आहे. त्यासाठी शासकीय स्तरावर जे काही प्रलंबित प्रश्न असतील, त्याबाबत संचालकांसह संबंधित अधिका-यांनी पाठपुरावा करून ते मार्गी लावण्याची भूमिका घ्यायला हवी, असे त्यांनी सांगितले. या बैठकीस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटा, उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपस्थित होते.